DAY — **07** SEAT NUMBER | | | | | | |

2025	II	18	1100	J-292	(M)

SECRETARIAL PRACTICE (52)

Time : 3 Hrs. **(7 Pages)** **Max. Marks : 80**

सूचना : *(१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.*

(२) उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

(३) डावीकडील अंक प्रश्नांचे क्रमांक दर्शवितात.

(४) प्रत्येक प्रश्नाच्या उत्तराचा प्रारंभ नवीन पानावर करावा.

प्र. १. (अ) खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा : (५) **[२०]**

(१) बंधपत्रधारक हा संस्थेचा -------- असतो.

(अ) सचिव

(ब) मालक

(क) धनको

(२) ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी कंपनीला -------- नियुक्ती करावी लागते.

(अ) कर्जरोखे विश्वस्तांची

(ब) ठेव विश्वस्तांची

(क) पत मानांकन संस्थांची

(३) कर्जरोख्यावर दिल्या जाणाऱ्या व्याजाचा दर ------ असतो.

(अ) स्थिर

(ब) बदलता

(क) अनिश्चित

(४) डिमॅट केलेले भाग ----- असतात.

(अ) अहस्तांतरणीय

(ब) फंगीबल

(क) वाहक

(५) केंद्र सरकार नाणे बाजारात --------- चे वाटप करून कर्जाऊ रक्कम उभारते.

(अ) व्यापारी पतपत्र

(ब) व्यापारी विपत्र

(क) राजकोष पत्र

(ब) खालील वाक्यातील अधोरेखित शब्द दुरुस्त करून वाक्य पुन्हा लिहा : (५)

(१) अमेरिकेत विक्री होणाऱ्या ठेव पावतीस जागतिक ठेव पावती असे म्हणतात.

(२) एफ.पी.ओ. म्हणजे जनतेला पहिल्यांदा भागांची सार्वजनिक विक्री करणे.

(३) बोनस भाग अग्रहक्क भागधारकांना मोफत भेट म्हणून दिले जातात.

(४) <u>लाभांश</u> दरवर्षी देणे कंपनीवर बंधनकारक आहे.

(५) भाग बाजार हा <u>नाणे</u> बाजाराचा एक महत्त्वाचा घटक आहे.

(ब) जोड्या जुळवा : (५)

'अ' गट	'ब' गट
(अ) वित्तीय बाजार	(१) सुरक्षित कर्जरोखे
(ब) समहक्क भागभांडवल	(२) १९९६
(क) मालमत्तेवर बोजा	(३) विविध वित्त स्त्रोतांचे मिश्रण
(ड) भागपेढी कायदा	
(इ) भांडवल संरचना	(४) वित्तीय प्रतिभूतींचा व्यापार
	(५) जोखमीचे भांडवल
	(६) असुरक्षित कर्जरोखे
	(७) वस्तूंचा व्यापार
	(८) सुरक्षित भांडवल
	(९) वस्तूंचे मिश्रण
	(१०) १९५६

(ड) खालील विधाने 'बरोबर' की 'चूक' ते लिहा : (५)

(१) एकदा जाहीर केलेला लाभांश रद्द करता येत नाही.

(२) कंपनीच्या घटनापत्रकातील भांडवल कलमामध्ये अधिकृत भांडवलाचा उल्लेख असतो.

(३) स्थिर भांडवलाला 'अभिसरण भांडवल' असेही म्हणतात.

(४) ठेवीदारांना मतदानाचे हक्क दिले जातात.

(५) मुंबई भाग बाजार (BSE) हा भारतातील सर्वात जुना भाग बाजार आहे.

प्र. २. खालील संज्ञा / संकल्पना स्पष्ट करा (कोणत्याही चार) : **[८]**

(१) स्थिर भांडवल

(२) अधिविकर्ष

(३) कर्जरोखे प्रमाणपत्र

(४) सुरक्षित ठेवी

(५) रिमटेरियलायझेशन

(६) तेजीवाला (Bull)

प्र. ३. खालील घटना / परिस्थितीचा अभ्यास करून आपले मत लिहा (कोणत्याही दोन) : **[६]**

(१) स्टार कंपनी लिमिटेड ने अलिकडेच एफ.पी.ओ. द्वारा जनतेला भागांची विक्री केली आहे. मागणी केलेल्या भागांपेक्षा जास्त भागांसाठी मागणी आली आहे. संचालक मंडळ भाग वाटप प्रक्रिया सुरू करू इच्छित आहे. कृपया संचालक मंडळाला सल्ला द्या :

(अ) कंपनीने भाग वाटप समिती नियुक्त करावी का?

(ब) ज्या भाग अर्जदारांना भागांचे वाटप झाले / केले आहे त्यांना कंपनीने कसे कळवावे?

(क) किती कालावधीत कंपनीने भाग प्रमाणपत्र द्यावे?

(२) श्री झेड यांनी पेक्युलर कंपनी लिमिटेड चे ५० भाग भौतिक स्वरूपात धारण केले असून ते इलेक्ट्रॉनिक स्वरूपात करण्याची त्यांची इच्छा आहे.

(अ) श्री झेड यांचे सी.एफ.डी.एच. बँक लिमिटेड मध्ये बचत खाते आहे या खात्यात डिमॅटसाठी त्यांचे भाग जमा केले जाऊ शकतात का?

(ब) त्यासाठी कोणत्या प्रकारचे खाते आवश्यक आहे?

(क) डिमॅट नंतर श्री झेड यांच्या समभागांचे परिरक्षक (custodian) आर.बी.आय. असेल का?

(३) XYZ कंपनी लिमिटेड २०२१-२२ वर्षासाठी लाभांश जाहीर करण्याचे निश्चित केले. त्यावर्षी कंपनीला अपेक्षे पेक्षा कमी नफा झाला आहे.

(अ) संचालक मंडळ मुक्त राखीव निधीतून रु. ५/- प्रतिभाग दराने लाभांशाची शिफारस करू शकते का?

(ब) वार्षिक सर्वसाधारण सभेच्या संमतीशिवाय संचालक मंडळ लाभांश जाहीर करू शकते का?

(क) संचालक मंडळ भेटीच्या स्वरूपात लाभांश देऊ शकते का?

प्र. ४. खालील मध्ये फरक स्पष्ट करा (कोणतेही तीन) : **[१२]**

(१) भाग आणि कर्जरोखे

(२) भागांचे हस्तांतरण आणि भागांचे संक्रमण

(३) अंतिम लाभांश आणि अंतरिम लाभांश

(४) प्राथमिक बाजार आणि दुय्यम बाजार

प्र. ५. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (कोणतेही दोन) : **[८]**

(१) बोनस भागांसंबंधी तरतुदी विशद करा.

(२) व्याजाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(३) भाग बाजाराची कोणतीही चार वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

प्र. ६. खालील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतेही दोन) : **[८]**

(१) व्यावसायिक संस्थेकडे वित्त पुरवठा करणाऱ्या स्त्रोतांचे विविध पर्याय उपलब्ध असतात.

(२) कंपनी फक्त विशिष्ट प्रकारच्या कर्जरोख्यांची विक्री करू शकते.

(३) कंपनीला ठेवीबाबत परिपत्रक किंवा जाहिरात प्रसिद्ध करतांना कायदेशीर तरतुदींची पूर्तता करावी लागते.

(४) आय.एस.आय.एन. (ISIN) हा डिमॅटचा आवश्यक घटक आहे.

प्र. ७. खालील प्रश्न सोडवा (कोणतेही दोन) : **[१०]**

(१) ठेवीदारास ठेवीचे नूतनीकरण केल्याबाबतचे पत्र लिहा.

(२) कर्जरोखेधारकास कर्जरोख्याचे समहक्क भागात परिवर्तन केल्याचे माहिती देणारे पत्र लिहा.

(३) लाभांशाचे वाटप लाभांश अधिपत्राद्वारे केल्याचे कळविणारे पत्र सभासदास लिहा.

प्र. ८. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणताही एक) : **[८]**

(१) अग्रहक्क भाग म्हणजे काय? अग्रहक्क भागांचे प्रकार स्पष्ट करा.

(२) भाग वाटप कार्यपद्धती स्पष्ट करा.

◆◆◆